
ePaper

## पुणे विमानतळावर पाच कोटींचा हायड्रोपोनिक गांजा जप्त

वर्ष - 9 । अंक - 169 | UDYAM-MH-26-0158827




महाईन्यूज™




पान 3 वरुन...

चऱ्होली एसटीपी जागेचा टीडीआर वाद

WWW.MAHAENEWS.COM | शनिवार, दि. 14 फेब्रुवारी 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### तीन वर्षांत सोलापूर-पुणे-मुंबई ‘वंदे भारत’मधून २३ लाख जणांचा प्रवास

# 'वंदे भारत'चा अनोखा विक्रम!



**महाईन्यूज । पुणे**

**पुणे-सोलापूर रेल्वे विभागातून सुरू झालेल्या सोलापूर-पुणे-मुंबई वंदे भारत एक्स्प्रेसने तीन वर्षांत २३ लाखांहून अधिक नागरिकांनी प्रवास केला आहे. ९ फेब्रुवारी २०२३ रोजी सोलापूर- मुंबईदरम्यान वंदे भारत सुरू झाली होती. जानेवारी २०२६ अखेरपर्यंत या गाडीची सरासरी १०२.२७ टक्के ऑक्युपन्सी नोंदली गेली असून, तब्बल २३ लाख ४३ हजार नागरिकांनी यातून प्रवास केला आहे.**

वंदे भारत एक्स्प्रेसने सोलापूर, पुणे आणि मुंबईदरम्यान आर्थिक, सामाजिक तसेच धार्मिक पर्यटनाला चालना दिली आहे. वेगवान प्रवास, अत्याधुनिक सुविधा आणि वेळेची बचत यामुळे ही सेवा नियमित प्रवाशांसाठी वरदान ठरली आहे.




आधुनिक ‘पुश-अँड-पूल’ तंत्रज्ञानामुळे भोर घाटासारख्या अवघड घाट विभागातून बँकर लोकोशिवाय ही गाडी धावते. दरम्यान पुणे-मुंबई-पुणे या मार्गावर तीन वर्षांत सुमारे साडेतेरा लाख प्रवाशांनी प्रवास केला आहे. सकाळच्या वेळी अतिरिक्त जलद सेवा उपलब्ध झाल्याने पुणेकरांना मोठा दिलासा मिळाला आहे.मुंबईत नोकरी-व्यवसायासाठी जाणारे आणि सायंकाळी परतणारे प्रवासी या गाडीला प्राधान्य देत आहेत. त्यामुळे या मार्गावर कायम प्रतिसाद मिळत असल्याचे रेल्वे प्रशासनाने स्पष्ट केले.

**वेळेची बचत, २० डब्यांचा रेक :**

सोलापूर-पुणे-मुंबई असा सुमारे ४५५ किलोमीटरचा प्रवास ही गाडी अवघ्या ६ तास ३० मिनिटांत पूर्ण करते. सुपरफास्ट गाड्यांच्या तुलनेत सुमारे दीड तासांची बचत होत आहे. कुर्डुवाडी, दौंड, पुणे, कल्याण, ठाणे आणि दादर हे या गाडीचे प्रमुख थांबे असून, आठवड्यातून सहा दिवस गाडी धावते. वाढत्या मागणीच्या पार्श्वभूमीवर ऑगस्ट २०२५ मध्ये १६ डब्यांच्या रेकऐवजी २० डब्यांचा रेक जोडण्यात आला. त्यामुळे आसनक्षमता १,४४० पर्यंत वाढली असून, मुंबईकडे जाणाऱ्या प्रवाशांची मोठी सोय झाली आहे.

### तीन वर्षांची कामगिरी



- एकूण प्रवासी संख्या : २३ लाख ४३ हजार
- प्रवासाचे अंतर : ४५५ किमी
- एकूण वेळ : ६ तास ३० मिनिटे
- आसनक्षमता : १,४४० (२० डबे)
- सरासरी ऑक्युपन्सी : १०२.२७%

### मार्गनिहाय प्रवासी संख्या



- पुणे ते मुंबई -- ६ लाख ७४ हजार
- मुंबई ते पुणे -- ६ लाख ७३ हजार
- सोलापूर ते पुणे - २ लाख २० हजार
- पुणे ते सोलापूर - १ लाख ७० हजार

# पुणे जिल्हा वार्षिक योजनेस निधी मंजूर

## कामे वेळेत पूर्ण करण्याचे उपमुख्यमंत्र्यांचे निर्देश

**महाईन्यूज । पुणे**

**जिल्ह्यात सुरू असलेले सर्व विकासप्रकल्प शिस्तबद्ध, गुणवत्तापूर्ण आणि ठरलेल्या कालमर्यादित पूर्ण करणे ही सर्व संबंधित यंत्रणांची सामूहिक जबाबदारी आहे, असे स्पष्ट निर्देश उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिले. पुणे जिल्हा वार्षिक योजना सन 2025-26 साठी 1 हजार 379 कोटी रुपयांचा नियतव्यय मंजूर झाला असून, उपलब्ध निधीचा शंभर टक्के व परिणामकारक वापर व्हावा, यासाठी काटेकोर नियोजन करावे, असे त्यांनी सांगितले.**



पुण्यातील विधानभवन येथे झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत त्यांनी दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे मार्गदर्शन केले. या वेळी कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, आमदार अमित गोरखे, भीमराव तापकीर, राहुल कुल, सिद्धार्थ शिरोळे, बापूसाहेब पठारे, बाबाजी काळे, शंकर मांडेकर, हेमंत रासणे, सुनील शेळके, शंकर जगताप, महापौर मंजूषा नागपुरे, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पिंपरी-चिंचवड मनपा आयुक्त श्रावण हर्डीकर, पीएमआरडीएचे सीईओ योगेश म्हसे, पुणे मनपा अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी., पिंपरी-चिंचवडचे पोलिस सह आयुक्त शशिकांत महावरकर, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जि. प. सीईओ चंद्रकांत वाघमारे, साबांविचे अधीक्षक अभियंता राहणे, जिल्हा नियोजन अधिकारी किरण इंदलकर उपस्थित होते. या वेळी उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, खा. सुप्रिया सुळे, खा. डॉ. अमोल कोल्हे, आ. शरद सोनवणे, पालक सचिव व्ही. राधा, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, शहर पोलिस आयुक्त अमितेश कुमार दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे उपस्थित होते. सन 2026-27 साठी शासनाने 1 हजार 32.88 कोटी रुपयांची वित्तीय मर्यादा निश्चित केली आहे. मात्र, विविध विभागांकडून तब्बल 3 हजार 128 कोटी रुपयांची मागणी प्राप्त झाली आहे. त्याची छाननी करून अतिरिक्त निधीसाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात येणार असल्याचे त्यांनी नमूद केले. जिल्हा नियोजन समितीमार्फत लहान तुकड्यांत विखुरलेली कामे न करता व्यापक परिणाम साधणारे मोठे प्रकल्प हाती घ्यावेत, असे पवार यांनी अधोरेखित केले. अतिमागास व दुर्गम भागांच्या पायाभूत सुविधांवर विशेष लक्ष केंद्रित करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. प्रशासकीय मान्यता, निविदा प्रक्रिया आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी यासाठी ठराविक कालमर्यादा निश्चित करून कामांचा नियमित आढावा घ्यावा, असेही त्यांनी सांगितले. बैठकीत सन 2025-26 मधील खर्चाचा आढावा घेण्यात आला. सर्वसाधारण योजनेसाठी 1,379 कोटी, अनुसूचित जाती उपयोजनेसाठी 145 कोटी आणि आदिवासी घटक कार्यक्रमासाठी 65 कोटी 46 लाख रुपयांचा आराखडा मंजूर झाल्याची माहिती प्रशासनाने दिली. विविध मंत्र्यांनी, खासदार-आमदारांनी विकासकामांबाबत सूचना मांडल्या. एप्रिलमध्ये प्रत्यक्ष उपस्थितीत सविस्तर आढावा बैठक घेण्यात येणार असल्याचेही पवार यांनी स्पष्ट केले.

### झुंबर सभागृहाला अजित पवार यांचे नाव द्या!

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या संकल्पनेतून उभारण्यात येणाऱ्या कोल्हापूर जिल्ह्यात आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट स्टेडियमकरिता जमीन देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यांच्या उपस्थितीत विधानभवन येथील झुंबर सभागृहात विविध बैठका आयोजित केल्या होत्या. त्यामुळे आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट स्टेडियम आणि पुणे विधान भवन येथील झुंबर सभागृहाला अजित पवार यांचे नाव द्यावे, अशी मागणी माधुरी मिसाळ यांनी केली.

# पुणे विमानतळावर पाच कोटींचा हायड्रोपोनिक गांजा जप्त

**महाईन्यूज । पुणे**

**बँकॉंकहून पुणे आंतराष्ट्रीय विमानतळावर उतरलेल्या प्रवाशाकडून केंद्रीय सीमा शुल्क विभागाच्या (कस्टम) पथकाने पाच कोटी ४२ लाख रुपयांचा हायड्रोपोनिक गांजा जप्त केला. प्रवाशने खेळण्याच्या खोक्यात गांजा लपविल्याचे तपासणीत उघडकीस आले.**




आंतराराष्ट्रीय विमानतळावर बँकॉंकहून आलेल्या विमानातून एक प्रवासी उतरला. विमानतळाच्या आवारातून तो घाईगडबडीत बाहेर पडण्याच्या प्रयत्नात होता. कस्टमच्या पथकाने त्याच्या संशयास्पद हालचाली टिपल्या. प्रवाशाला चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडील सामानाची तपासणी करण्यात आली.

तेव्हा त्याच्याकडे असलेल्या सामानात खेळण्याची खोकी सापडली. खेळण्याच्या पाच खोक्यात गांजा ठेवल्याचे तपासणीत उघडकीस आले. त्याच्याकडून जप्त करण्यात आलेल्या गांजाची किंमत आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत पाच कोटी ४२ लाख रुपये असल्याची माहिती कस्टमच्या अधिकाऱ्यांनी दिली.

त्याच्याविरुद्ध अमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणी प्रवाशाला अटक करण्यात आली. त्याने गांजा कोठून आणला ?, तसेच तो गांजाची विक्री कोणाला करणार होता ? याद्दष्टीने तपास करण्यात येत आहे. गेल्या वर्षी सप्टेंबर महिन्यात बँकॉंकहून 'हायड्रोपोनिक' गांजा विक्रीसाठी घेऊन आलेल्या चौघा प्रवाशांना कस्टमच्या पथकाने पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावर पकडले. प्रवाशांकडून सुमारे दहा कोटी रुपयांचा १३ किलो ७२५ ग्रॅम हायड्रोपोनिक' गांजा जप्त करण्यात आला होता. गेल्या एक ते दोन वर्षांपासून हायड्रोपोनिक गांजाची तस्करी वाढली आहे. नियंत्रित वातावरणात गांजाची लागवड केली जाते. त्यामुळे याला 'हायड्रोपोनिक गांजा' असे म्हटले जाते. या गांजाची लागवड बंदिस्त जागेत करण्यात येते.

# चऱ्होली एसटीपी जागेचा टीडीआर वाद

## १७ वर्षांनंतर वाढीव रेडीरेकनर दराने टीडीआर; नगररचना विभागावर प्रश्न

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**चऱ्होली येथील एक खासगी जागा मैलासांडपाणी शुद्धीकरण प्रक्रिया केंद्रासाठी (एसटीपी) सन 2008 ला ताब्यात घेण्यात आली. त्याच्या मोबदल्यात टीडीआर देण्याचा निर्णय तब्बल 17 वर्षांनंतर म्हणजे ऑगस्ट 2025 ला घेण्यात आला. मात्र, रेडिरेकनरचा 673 रुपये चौरस फूट असलेला दर तब्बल 1 हजार 210 रुपये चौरस फूट एवढा करून 59 कोटी रुपयांऐवजी 213 कोटी रुपयांचा मोबदला त्या माध्यमातून दिला गेला. महापालिकेच्या नगर रचना विभागाच्या टीडीआर वाटपातील या आर्थिक हितसंबंधांच्या व्यवहारावरून शंका उपस्थित केली जात आहे.**




महापालिकेने सन 2008 ला चऱ्होली येथील सर्व्हे क्रमांक 33 येथील 11 लाख 74 हजार 62 चौरस फूट जागेवर एसटीपीचे आरक्षण टाकण्यात आले. त्या जागेचा मोबदला भूसंपादन नियमानुसार घेणार नसून, तो टीडीआर स्वरूपात घेऊ असे जागा मालकाने लेखी दिले होते. त्या नियमाकडे महापालिका प्रशासनाकडून दुर्लक्ष करण्यात आल्याचे स्पष्ट होत आहे. त्या जागेच्या टीडीआर स्वरूपात मोबदला देण्याचा निर्णय घेण्यात आला. मोबदला देताना टीडीआर देताना रेडिरेकनर दरात वाढ करण्यात आली. मुद्रांक शुल्क महानिरीक्षकांनी चर्होली येथील जागेचा 673 रुपये प्रतिचौरस फूट असलेला रेडिरेकनरचा दर तब्बल 1 हजार 210 रुपये प्रतिचौरस फूट इतका वाढवला. तो निर्णय 18 ऑगस्ट 2025 रोजी घेण्यात आला. तो निर्णय एका राजकीय व्यक्तीमुळे घेण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. त्या निर्णयात तसे नमूद करण्यात आल्याचे सांगितले जात आहे. चऱ्होली येथील ठराविक जागेचा रेडीरेकनर दर वाढवून महापालिकेकडून वाढीव दराने मोबदला दिल्या गेल्याबद्दल तसेच, सन 2008 मध्ये जागा ताब्यात घेतली असताना 17 वर्षांनंतर आजच्या दराने टीडीआर देण्यात आल्याने नगर रचना विभागाच्या हेतूबाबत शंका उपस्थित केली जात आहे. या वाढीव टीडीआर वाटप प्रकरणावरून महापालिका वर्तुळात उलटसुलट चर्चा रंगली आहे. त्या प्रकरणासंदर्भात सर्व व्यवहार आमचे वकील पाहतात, ते तुमच्याशी बोलतील, असे जागामालक नीलेश कलाटे यांनी सांगितले.

### जागामालकाला 154 कोटी रुपयांचा फायदा


पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या टीडीआर समितीने जागामालकाला 11.74 लाख स्क्वेअर फूट टीडीआर मंजूर केला. 673 रुपयांऐवजी 1,210 रुपये प्रति चौरस फूट दर लागू केल्याने मोबदला 59 कोटींवरून 213 कोटींवर गेला असून, सुमारे 154 कोटींचा अतिरिक्त लाभ मिळाला आहे.

> “नियमानुसार टीडीआरचे वाटप रेडिरेकनरचे दर आम्ही ठरवत नाही. संबंधित विभागाकडून ठरलेल्या रेडिरेकनर दरानुसार चऱ्होली येथील जागेच्या मोबदल्यात टीडीआर देण्यात आला आहे. ती प्रक्रिया नियमानुसार झाली आहे.
>
> – **किशोर गोखले, उपसंचालक, नगर रचना विभाग, महापालिका**

# प्राधिकरणातील ‘हरित सेतू’ प्रकल्प ठरतोय विकासाचा नवा मानदंड

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**निगडी प्राधिकरण परिसरात राबविण्यात येणारा हरित सेतू प्रकल्प हा शहराच्या नियोजनबद्ध व पर्यावरणपूरक विकासाच्यादृष्टीने एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरत आहे. या प्रकल्पामुळे वाहतूक, सुरक्षितता आणि सार्वजनिक सुविधा यामध्ये सकारात्मक बदल घडून येत असून, नागरिकांच्या दैनंदिन जीवनात सुलभता निर्माण होत आहे. स्वतंत्र सायकल ट्रॅक व पदपथामुळे सायकलस्वार आणि पादचाऱ्यांच्या सुरक्षेला महत्त्व दिले गेले आहे.**




सद्यस्थितीत निगडी, प्राधिकरण परिसरातील रस्त्यांची कामे पूर्ण झाली असून, उर्वरित भागातील रस्त्यांची कामे प्रगतीपथावर आहेत. प्रशासन आणि नागरिक यांच्या समन्वयातून हरीत सेतू प्रकल्प प्रभावीपणे राबविण्यात येत असून, परिसरातील नागरिकांकडून या उपक्रमाचे स्वागत होत आहे. निगडी प्राधिकरण भाग अधिक स्वच्छ, सुरक्षित, शिस्तबद्ध व नागरिक केंद्रित बनवण्याच्या दिशेने हा प्रकल्प एक आदर्श ठरत आहे, असे नागरिकांचे मत आहे.



### पर्यावरणपूरक वाहतुकीला प्रोत्साहन

हरीत सेतू प्रकल्पांतर्गत चालणाऱ्या नागरिकांसाठी सुरक्षित पदपथ, सायकलस्वारांसाठी स्वतंत्र सायकल ट्रॅक तसेच, सार्वजनिक जागांचे सुयोग्य नियोजन करण्यात येत आहे. यामुळे वाहनांवरील अवलंबित्व कमी होऊन पर्यायी, पर्यावरणपूरक वाहतुकीला प्रोत्साहन मिळत आहे. या प्रकल्पामुळे रस्त्यांची मांडणी अधिक शिस्तबद्ध झाली असून, पादचाऱ्यांची सुरक्षितता वाढली आहे. नागरिकांना चालण्यासाठी, सायकल चालवण्यासाठी व मोकळ्या जागांचा वापर करण्यासाठी सुस्थितीत सुविधा उपलब्ध होत आहेत. त्यामुळे आरोग्यदायी जीवनशैलीकडे नागरिकांचा कल वाढत असल्याचे चित्र दिसत आहे.

# व्हॅलेंटाईन डे : प्रेमाचा खरा अर्थ काय?



## भूमिका

**आज कागदाचे हृदय, चॉकलेटचे हृदय, फुग्यांचे हृदय आणि बाजारातून विकत घेतलेल्या कृत्रिम प्रतीकांपलीकडे जाऊन खऱ्या भावना ओळखण्याची गरज आहे. व्हॅलेंटाईन डेचा खरा उद्देश काय आहे, याचा विचार आपण करायला हवा, आपल्या आयुष्यातील महत्त्वाच्या प्रत्येक व्यक्तीबद्दल कृतज्ञता आणि प्रेम व्यक्त करण्याचा.**

अनेक लोक जीवनसाथी नसल्यामुळे स्वतःवर दया करतात, स्वतःला प्रेमास पात्र समजत नाहीत आणि आपल्या एकटेपणाची तुलना प्रेमात असलेल्या जोडप्यांशी करतात. तर दुसरीकडे, नात्यात असूनही काही जण एकाकी वाटतात, कारण त्यांच्या जोडीदाराला व्हॅलेंटाईन डे आठवत नाही किंवा त्यांच्या अपेक्षा पूर्ण होत नाहीत. या दोन्ही परिस्थितीत एक चुकीची धारणा तयार होते: नात्यात असणे म्हणजेच प्रेम. जेव्हा आपण व्हॅलेंटाईन डे फक्त रोमान्सपुरता मर्यादित करतो, तेव्हा अनेकांना या उत्सवाबाहेर ढकलतो. कारण प्रत्येकाला रोमँटिक प्रेम मिळेलच असे नाही.

समाजातील काहीजण प्रेम साजरे करण्यासाठी वेगळा दिवस असणे हे दिखाऊपण मानतात. काही तरुण या दिवशी भेटवस्तूंमधून प्रेमाची मोजमाप करतात, तर काहींना हा दिवस केवळ उपभोगवादाचे जाळे वाटतो. एका शालेय सर्वेक्षणात ३२७ विद्यार्थ्यांपैकी ५२% विद्यार्थ्यांनी व्हॅलेंटाईन डे महत्त्वाचा नसल्याचे म्हटले. मात्र त्याच सर्वेक्षणात ४१.६% विद्यार्थ्यांनी हा दिवस मित्रांसोबत साजरा करतो असे सांगितले, तर केवळ २८.७% जण जोडीदारासोबत वेळ घालवतात. हे आकडे स्पष्ट करतात की व्हॅलेंटाईन डे फक्त रोमँटिक प्रेमापुरता मर्यादित नाही. लोक अजूनही मैत्री आणि नात्यांमधील प्रेम साजरे करतात. या दिवसाच्या इतिहासाकडे पाहिले तर त्याची मुळे तिसऱ्या शतकातील रोमन संत व्हॅलेंटाईनमध्ये आढळतात. इतिहासकारांच्या मते, त्यांनी सम्राटाच्या आदेशाविरुद्ध जाऊन गुप्तपणे प्रेमी युगुलांचे विवाह लावून दिले. त्या काळात प्रेमींना वेगळे राहण्याचा कायदा होता आणि पुरुषांना सैन्यात पाठवले जात होते. या कृतींसाठी संत व्हॅलेंटाईनला काहीही लाभ झाला नाही. त्यांना मृत्यू पत्करावा लागला. त्यांनी स्वतःसाठी नव्हे, तर इतरांच्या प्रेमासाठी बलिदान दिले. व्हॅलेंटाईन डेचा खरा अर्थ म्हणजे या निस्वार्थ प्रेमाची आठवण ठेवणे.



जे ५२% लोक हा दिवस निरर्थक मानतात, त्यांनी पुन्हा विचार करण्याची गरज आहे. आपले जीवन धावपळीचे झाले आहे. दिवसाच्या शेवटी आपण इतके थकतो की आपल्या प्रिय व्यक्तींना आठवण्यासही वेळ मिळत नाही. कटू सत्य असे की आपण आपल्या भावना व्यक्त करायला विसरतो. काही जण म्हणतात कृती शब्दांपेक्षा मोठी असते, पण कधी कधी प्रत्येकाला हे ऐकण्याची गरज असते. "तू माझ्यासाठी महत्त्वाचा आहेस."

व्हॅलेंटाईन डे उपभोगवादाशी जोडला जातो, पण वर्षातील ३६५ दिवसांपैकी एक दिवस जरी असा असला की जो आपल्याला एकमेकांची काळजी घेण्याची आणि स्वतःवर प्रेम करण्याची आठवण करून देतो, तर त्यात गैर काहीच नाही. उलट, हा दिवस आपल्या नात्यांचे, मैत्रीचे आणि आत्मप्रेमाचे महत्त्व साजरे करण्याचा आहे. संत व्हॅलेंटाईनच्या निस्वार्थतेतून प्रेरणा घेत, प्रेमाचा खरा अर्थ पुन्हा शोधण्याचा दिवस म्हणजे व्हॅलेंटाईन डे.

## प्रासंगिक »

### वेळेचे महत्त्व

***एक स्वार आपल्या घोड्याला खरारा करून त्याच्यावर खोगीर घालत असता घोड्याच्या एका पायाच्या नालाचा एक खिळा सुटून पडला आहे असे त्याला दिसले.***

पण तेथे दुसरा खिळा बसविण्याचे काम त्याने मागे टाकले. काही वेळाने लढाईवर जाण्याचे इशारे देण्याचे शिंग वाजू लागताच तो स्वार आपल्या घोड्यावर बसून लढाईच्या जागेकडे निघाला. त्या फौजेच्या सेनापतीने हुकूम सोडला की, 'सर्वांनी आपले घोडे भरधाव सोडून शत्रूंवर तुटून पडावे व त्यांचा पाठलाग करावा.' हुकमाप्रमाणे तो स्वार आपला घोडा उडवीत चालला असता खिळा पडल्यामुळे सैल झालेला घोड्याचा नाल गळून पडला व त्यामुळे घोडा लंगडत लंगडत चालू लागला. लंगडताना एका दगडावर त्याचा पाय आपटल्यामुळे स्वार घोड्यावरून खाली पडला व तो शत्रूच्या हाती सापडताच शत्रूने लगेचच त्याला मारले.

**तात्पर्य-**

जेव्हाचं काम तेव्हा न करता ते आळसाने पुढे ढकलणे ही सवय वाईट व घातक आहे.

कर्नाटकातील काँग्रेस सरकारमध्ये नेतृत्वबदलाचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून त्यामुळे पक्षातील अंतर्गत संघर्ष तीव्र झाला आहे. सरकारला अडीच वर्षे पूर्ण झाल्यानंतर ठरल्याप्रमाणे उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांना मुख्यमंत्रिपद देण्याबाबत चर्चा सुरू आहे.

## काँग्रेसच्या अडचणी वाढवणाऱ्या घडामोडी

मात्र विद्यमान मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांना पदावरून हटवण्याबाबत हायकमांड स्पष्ट भूमिका घेत नसल्याने तिढा वाढत चालला आहे.

शिवकुमार आणि त्यांचे समर्थक नेतृत्वबदलाची मागणी आक्रमकपणे पुढे रेटत आहेत. त्यांनी दिल्लीमध्ये सोनिया गांधी, राहुल गांधी, मल्लिकार्जुन खर्गे आणि के. सी. वेणुगोपाल यांची भेट घेऊन सत्ता वाटपाचा शब्द पाळण्याची मागणी केली. दुसरीकडे सिद्धरामय्या मात्र आपल्या पदावर ठाम दिसत असून त्यांनी प्रशासनिक बैठका सुरू ठेवल्या आहेत. त्यांचे पुत्र डॉ. यतिंद्र सिद्धरामय्या यांनीही नेतृत्वबदलाचा प्रश्नच उद्भवत नसल्याचे सांगत ते पाच वर्षे मुख्यमंत्री राहतील असा दावा केला आहे. यामुळे दोन्ही गटांतील संघर्ष उघड झाला आहे.

शिवकुमार समर्थकांनी असा आरोप केला आहे की नेतृत्वबदलाच्या मुद्द्यावर त्यांना नोटिसा देण्यात आल्या, पण सिद्धरामय्या समर्थकांवर



कारवाई होत नाही. या वादात तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांनीही हस्तक्षेप करून शिवकुमार यांना संधी देण्याचा सल्ला दिला. शिवकुमार यांनीही पूर्वी केलेल्या त्यागाची आठवण करून देत हायकमांडवर नैतिक दबाव वाढवला आहे.

दरम्यान, राहुल गांधी सिद्धरामय्या यांना बदलण्याच्या मन:स्थितीत नसल्याचे संकेत आहेत. सिद्धरामय्या हे 'अहिंद' समीकरणातील महत्त्वाचे नेते असल्याने त्यांना हटवल्यास आगामी निवडणुकांवर परिणाम होईल, अशी भीती पक्षाला वाटते. परंतु शिवकुमार यांना बाजूला ठेवल्यास त्यांच्या समर्थकांचा रोष ओढवू शकतो. त्यामुळे कोणताही निर्णय घेतला तरी पक्षात नाराजी अटळ आहे.

परिस्थिती आणखी गुंतागुंतीची बनवणाऱ्या हालचालीही सुरू आहेत. सिद्धरामय्या समर्थक आमदार विदेश दौऱ्यावर जाण्याच्या तयारीत आहेत, तर शिवकुमार समर्थक आमदार रिसॉर्ट राजकारणाचा विचार करत असल्याची चर्चा आहे. या सत्तासंघर्षामुळे काँग्रेसमधील अंतर्गत मतभेद पुन्हा एकदा चव्हाट्यावर आले आहेत.

एकूणच, हायकमांडसमोर कठीण पेच निर्माण झाला आहे. एका गटाचे समाधान केले तर दुसरा गट नाराज होणार हे निश्चित आहे. ठोस निर्णय न झाल्यास कर्नाटकातील सत्तासंघर्ष आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नेतृत्वबदलाचा प्रश्न लवकर निकाली न निघाल्यास काँग्रेसच्या राजकीय अडचणी वाढण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत.

## ।। अभंगवाणी ।।



सदा माझे डोळे जडो तुझे मूर्ती ।
रखुमाईच्या पती सोयरिया ॥१॥

गोड तुझें रूप गोड तुझें नाम ।
देईं मज प्रेम सर्व काळ ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे.
एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# जय हो... का? जय जय महाराष्ट्र लावा!

## कोस्टल रोडवरील गाण्यावरून मनसेचं खळखट्याक; सरकारला अल्टिमेटम!

**महाईन्यूज । मुंबई**

**धर्मवीर, स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज किनारी मार्गावर (मुंबई कोस्टल रोड) वाहनचालकांसाठी एक आगळावेगळा अनुभव देणारी अभिनव संगीत संकल्पना तयार करण्यात आली आहे. या रस्त्यावर विशेष तंत्रज्ञानाच्या साहाय्याने संगीत पट्टे बसविण्यात आले आहेत. या संगीत मार्गावरील (मेलोडी रोड) पट्ट्यांवरून वाहन गेल्यावर स्लमडॉग मिलेनियर चित्रपटातील ‘जय हो’ या गाण्याची धून कानी पडते.**



जगातील पाचवा आणि भारतातील पहिलाच प्रयोग असलेल्या या प्रकल्पाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत बुधवारी लोकार्पण करण्यात आले. दरम्यान, या प्रयोगावर आता महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने आक्षेप घेतला आहे.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे युवानेते अमित ठाकरे यांनी याविरोधात काल पोस्ट केल्यानंतर आज मनसेचे काही कार्यकर्ते कोस्टल रोडवर जमले. त्यांनी या गाण्याचा निषेध केला. महाराष्ट्रात जय हो गाणं लावण्याऐवजी महाराष्ट्र गीत का लावलं नाही, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. तसंच, हे गाणं बदललं नाहीतर भविष्यात तीव्र आंदोलन करू, असा इशाराही मनसैनिकांनी दिला आहे.

मनसेचे पदाधिकारी म्हणाले, “आम्ही फक्त सिग्नल दिला आहे. येत्या काळात यावर विचार केला नाही तर यापेक्षा मोठं आंदोलन करू. महाराष्ट्रात अनेक प्रश्न असताना ही नाटके चालू आहेत. ‘जय हो...’ कोणाचा? अमित शाहांचा, मोदींचा की दिल्लीश्वरांचा? महाराष्ट्रात मराठी गीत किंवा महाराष्ट्र गीत लावा. जाणीवपूर्वक मराठी लोकांना डिवचण्याचा हा प्रयत्न आहे.”

### अमित ठाकरे काय म्हणाले..?



मुंबई महानगरपालिकेचा कोस्टल रोडवरचा म्युझिकल रोडचा प्रयोग नक्कीच नवीन आहे. काहीतरी वेगळं आहे. तंत्रज्ञानाचा असा वापर केल्याबद्दल प्रशासनाचं अभिनंदन! पण मुंबईकरांना खरंच याची गरज आहे का? ही मुंबईकरांची ‘बेसिक’ मागणी तरी होती का? रस्त्यांचे इतके महत्त्वाचे प्रश्न प्रलंबित ठेवून हा कसला अट्टाहास? खरंतर कोस्टल रोड म्हणजे रोजच्या ट्राफिकच्या गोंगाटून जरा शांतता! काही दिवस हे कुतूहल म्हणून ठीक वाटेल, पण रोजच्या प्रवाशांसाठी हा केवळ ‘गोंगाट’ ठरणार नाही का? तसेच, गाडी चालवताना ड्रायव्हरचं लक्ष विचलित होण्याची शक्यता प्रशासनाने तपासली आहे का? आणि बरं, काही वाजवायचंच होतं तर, मग आपल्या मराठी मातीतलं गाणं का नाही? आपल्या महाराष्ट्राची ओळख सांगणारं एखादं मराठमोळं गाणं नाही? गर्जा महाराष्ट्र माझा सारखं आपल्या राज्यगीत किंवा स्वरसम्राज्ञी लतादीदींच्या अजरामर स्वरातील एखादं गाणं निवडलं असतं, तर अतिउत्तम झालं असतं!

# नाशिक-पुणे रेल्वेमार्ग प्रस्तावाच्या फेरविचारास रेल्वेमंत्री सकारात्मक!

**महाईन्यूज । पुणे**

**नाशिक-पुणे रेल्वेमार्गाच्या प्रस्तावाचा फेरविचार करण्याचे रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी सकारात्मकता दाखवली असल्याची माहिती पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी, रेल्वेमंत्र्याच्या दिल्लीतील भेटीनंतर समाज माध्यमावर जाहीर केले आहे. या प्रस्तावाचा फेरविचार व्हावा व नाशिक-पुणे जलदगती रेल्वेमार्ग मुळ प्रस्तावाप्रमाणे अकोले तालुक्यातून जावा तसेच या रेल्वेमार्गावर तालुक्यातील देवठाण तसेच बोटा (संगमनेर) ही स्थानके असावीत अशी अकोलेकरांची मागणी आहे.**



मंत्री विखे यांनी रेल्वेमंत्री आश्विनी वैष्णव यांची नवीदिल्ली येथे सदिच्छा भेट घेतली. या भेटीदरम्यान नाशिक–पुणे जलदगती रेल्वे प्रकल्पाबाबत रेल्वेमंत्र्यांबरोबर त्यांनी चर्चा केली. या प्रकल्पाच्या प्रस्तावित मार्गात अलीकडे करण्यात आलेल्या बदलाच्या निर्णयाचा फेरविचार करावा, अशी विनंती यावेळी त्यांनी रेल्वेमंत्र्यांकडे केली.

काही दिवसांपूर्वी घेतलेल्या निर्णयामुळे संगमनेर व अकोले तालुक्यातील लोकप्रतिनिधी तसेच नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे, हीबाब यापूर्वीच मंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली होती. त्यामुळे स्थानिक जनभावना, विकासाचा समतोल आणि परिसराच्या हिताचा विचार करून रेल्वेमार्ग पहिल्या प्रस्तावित मार्गानुसारच ठेवावा, अशी भूमिका त्यांनी यावेळी मांडली.

रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी या विषयावर सकारात्मक प्रतिसाद देत प्रस्तावाचा फेरविचार करण्याचे आश्वासन दिल्याचे विखे यांनी त्यांच्या समाज माध्यमावर सांगितले आहे. नाशिक-पुणे जलदगती रेल्वेमार्ग मुळ सर्वेक्षणाप्रमाणे नाशिक-सिन्नर-देवठाण (अकोले)- संगमनेर मार्गे जाणार होता. महाराष्ट्र राज्य व केंद्र सरकार खर्चाचा पन्नास-पन्नास टक्के वाटा उचलणार होते.

मात्र या रेल्वेमार्गाच्या प्रस्तावात दोनवेळा बदल झाले. त्यामुळे प्रस्तावित रेल्वेमार्ग अकोल्यापासून दूर गेला. देवठाण स्थानक रेल्वे मार्गाच्या प्रस्तावातून गायब झाले. साहजिकच याची तीव्र प्रतिक्रिया अकोले तालुक्यात उमटली. अकोले तालुका रेल्वे कृती समितीच्या माध्यमातून याविरुद्ध आंदोलन छेडण्यात आले. अकोले ते संगमनेर असा पंचवीस किलोमीटर मोर्चा काढण्यात आला होता.




मध्यंतरी अकोले तालुक्याच्या दौऱ्यावर असताना देवठाण येथील कार्यक्रमात मंत्री विखे यांनी रेल्वे मुळ प्रस्तावाप्रमाणे देवठाण मधूनच जाईल, असे जाहीर केले होते. रेल्वेप्रश्नी बोटा येथे झालेल्या आंदोलनावेळी या प्रश्नावर आंदोलकांच्या शिष्टमंडळाची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबरोबर भेट घडवून आणण्याचे आश्वासन दूरधनीवरून आंदोलकांना दिले होते. त्यानंतरच आंदोलन मागे घेण्यात आले. मात्र अद्याप मुख्यमंत्र्यांच्या भेटीची तारीख निश्चित झालेली नाही. मुख्यमंत्र्यांची या प्रश्नावरील भूमिका महत्वाची असणार आहे.

# ‘थलपती विजय’च्या रॅलीत पुन्हा दुर्घटना!

## महाराष्ट्रातील तरुणाचा मृत्यू; दवाखान्याबाहेर पत्रकार-पक्षाचे कार्यकर्ते भिडले

**महाईन्यूज । तमिळनाडू**

**राजकारणात पदार्पण केलेल्या सुपरस्टार विजयच्या अडचणी संपण्याचे काही नाव घेत नाहीत. करुर येथील चेंगराचेंगरीत ४१ नागरिकांचा मृत्यू झाल्याची घटना ताजी असताना आता पुन्हा एकदा त्याच्या रॅलीत दुर्घटना घडली आहे. तमिळनाडू येथील सेलमच्या रॅलीत महाराष्ट्रातील ३७ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला आहे. मृत तरुणाला ज्या रुग्णालयात दाखल करण्यात आले त्या रुग्णालयाबाहेर पत्रकार आणि तमिलगा वेत्री कझगम पक्षाचे कार्यकर्ते भिडले.**



### हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू

मिळालेल्या माहितीनुसार, तामिळनाडूतील सेलम येथे तमिलगा वेत्री कझगम (TVK) पक्षाच्या वतीने रॅलीच्या आयोजन करण्यात आले होते. सुपरस्टार विजय या रॅलीसाठी हजेरी लावली होती. यावेळी सूरज (वय ३७) या तरुणाचा मृत्यू झाला. सूरजचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

### करुर येथील रॅलीत चेंगराचेंगरी

विजयच्या २७ सप्टेंबर २०२५ रोजी करुर येथील रॅलीत मोठी चेंगराचेंगरी झाली होती. यात ४१ नागरिकांचा मृत्यू झाला होता तर, अनेकजण जखमी झाले होते. सध्या सीबीआय घटनेचा तपास करत असून, विजयला चौकशीसाठी सरकारी कार्यालयाच्या चकरा माराव्या लागत आहेत.

### पोलिसांनी काय दिली माहिती?

रॅली सुरु असताना सूरज अत्यवस्थ होऊन खाली कोसळला त्यानंतर लगेच त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले. पण, डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाल्याची शक्यता डॉक्टरांनी व्यक्त केली. याप्रकरणी अधिक तपास सुरु असल्याचे पोलिसांनी सांगितले.

### पत्रकार, पक्षाचे कार्यकर्ते भिडले

रॅलीत सूरज खाली कोसळल्यानंतर त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले. पण, त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. दरम्यान, सेलम येथे रुग्णालयाबाहेर जमा झालेल्या पत्रकार आणि पक्षाचे कार्यकर्ते एकमेकांना भिडले. दोन्ही गटात हामरीतुमरी झाल्याचे पाहायला मिळाले. आक्रमक झालेल्या दोन्ही गटांना शांत करण्यासाठी पोलिसांनी मध्यस्थी केल्याचे व्हिडिओत दिसून येते.

### तमिळनाडू विधानसभा निवडणूक

तमिळनाडूमध्ये येत्या काही दिवसांत विधानसभा निवडणुकीची घोषणा होण्याची शक्यता आहे. सुपरस्टार विजय अभिनयानंतर राजकारणात नशीब आजमावत आहे. त्याच्या तमिलगा वेत्री कझगम पक्षाला राज्यातून चांगला प्रतिसादही मिळत आहे. विजय राज्यभर करत दौरे करत आहे. सेलममधील सीलानाईकेनपट्टी येथेही आयोजित सभेला निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर त्याने संबोधित केले.

# उत्तर कोरियाचे हुकूमशहा किम जोंग उन यांचा उत्तराधिकारी ठरला

**महाईन्यूज । उत्तर कोरिया**

**उत्तर कोरियाचे हुकूमशाह किम जोंग उन हे कोणत्या न कोणत्या कारणांमुळे नेहमीच चर्चेच्या केंद्रस्थानी असतात. किम जोंग उन यांच्या कोणत्याही निर्णयांची जगभरात चर्चा असते. आता किम जोंग उन यांचा उत्तराधिकारी ठरला असल्याची माहिती समोर आली आहे. किम जोंग उन यांचा उत्तराधिकारी कोण असणार याबाबत अनेकदा वेगवेगळे तर्कवितर्क लावले जात होते. पण आता उत्तर कोरियाचं पुढील नेतृत्व कोणाकडे असणार? याचा निर्णय झाल्याची माहिती समोर आली आहे.**



हुकूमशाह किम जोंग-उन हे त्यांच्या मुलीकडे देशाची सूत्रे देण्याची तयारीत आहेत, म्हणजे उत्तर कोरियाची पुढची हुकूमशाह ही किम जोंग यांची मुलगी असेल. दक्षिण कोरियाची गुप्तचर संस्था, नॅशनल इंटेलिजन्स सर्व्हिसने (एनआयएस) आज त्यांच्या संसद सदस्यांबरोबर झालेल्या बैठकीदरम्यान ही माहिती जाहीर केल्याचं बीबीसीने एका वृत्तात म्हटलं आहे. मात्र, असं असलं तरी त्या संदर्भात उत्तर कोरियाकडून अधिकृत माहिती अद्याप जारी करण्यात आलेली नाही.

वृत्तानुसार, किम जोंग-उन हे यांनी त्यांची मुलगी किम जू-ए हिला आपला पुढचा उत्तराधिकारी म्हणून निवड केली आहे. दरम्यान, किम जोंग उन यांनी मुलगी किम जू ए हिला त्यांच्या अनेक दौऱ्यात सहभागी केलं होतं. एनआयएसने किम जोंग उन यांचा उत्तराधिकारी ठरल्याचं मूल्यांकन करताना त्यांनी अधिकृत कार्यक्रमांमध्ये किम जू ए यांची वाढती प्रमुख सार्वजनिक उपस्थिती विचारात घेतली आहे.

**किम जू ए उत्तर कोरियाची हुकूमशहा होणार?**

२०२३ मध्ये उत्तर कोरियातील एका भव्य लष्करी परेडदरम्यानचा एक प्रसंग विशेष लक्षवेधी ठरला. एका सर्वोच्च लष्करी अधिकाऱ्याने किम जू एच्या समोर गुडघे टेकून आदर व्यक्त केला. याआधी हा आदर केवळ किम जोंग-उन यांनाच दिला जात होता. किम जू एची सार्वजनिक मंचावरील उपस्थिती वाढली असल्याने ती उत्तर कोरियाची पुढील हुकूमशाह होऊ शकते, असा अंदाज व्यक्त करण्यात येत होता.

### किम जू ए कोण आहे?

किम जू ए नेमकी किती वर्षांची आहे, याबाबत कुठलीही माहिती नाही. मात्र, दक्षिण कोरियाच्या गुप्तचर संस्थेच्या माहितीनुसार ती साधारण १३ वर्षांची आहे आणि साधारण २०२२ मध्ये किम जु-ए ही पहिल्यांदाच जगासमोर आली. नोव्हेंबर २०२२ मध्ये किम जोंग-उन यांनी पहिल्यांदा त्यांच्या मुलीची सर्वांसमोर ओळख करून दिली होती. त्यानंतर किम जु-ए अनेक माध्यमांवर वारंवार दिसू लागली. देशाच्या लष्करी आणि औपचारिक कार्यक्रमांमध्ये ती नेहमीच आपल्या वडिलांबरोबर सार्वजनिक मंचावर उपस्थित असते. किम जोंग-उन यांनी उत्तर कोरियामधील माध्यमांवर कडक निर्बंध घातलेले आहेत, त्यामुळे प्रसारमाध्यमांनी कधीही किम जू-एचे नाव घेतलेले नाही. ती केवळ नेत्याची सर्वात लाडकी मुलगी किंवा आदरणीय कन्या या नावानेच ओळखली जाते.



## बॉलीवूड अभिनेत्रीची बॉयफ्रेंडने केली फसवणूक

बॉलीवूडमधील अनेक सेलिब्रिटी त्यांच्या रिलेशनशिपमुळे चर्चेत असतात. अलीकडेच तारा सुतारिया व वीर पाहारिया, खूशी कपूर व वेदांग रैना यांचं ब्रेकअप झालं अशा चर्चा सुरू होत्या. अशातच आता लोकप्रिय बॉलीवूड अभिनेत्रीनेही तिच्या ब्रेकअपबद्दल सांगितलं आहे.रिलेशनशिपमध्ये असताना आपला बॉयफ्रेंड दुसऱ्या मुलींशी चॅटिंग करत होता आणि त्याने इमोशनल चिटिंग केली आहे असा आरोप बॉलीवूड अभिनेत्री शनाया कपूरने तिच्या एक्स बॉयफ्रेंडवर केला आहे. रिलेशनशिप अडव्हाजइवर तिने याबद्दल सांगितलं आहे. शनाया याबद्दल नेमकं काय म्हणाली, याबद्दल जाणून घेऊयात....बॉयफ्रेंडबद्दल काय म्हणाली शनाया? शनाया याबद्दल म्हणाली, "मी माझ्या बॉयफ्रेंडबरोबर परदेशात होते. तेव्हा मी विचार करत होते, वाह किती छान सुरू आहे सगळं. किती छान आयुष्य जगतीये मी. हे रिलेशनशिप सर्वात भारी आहे. आम्ही डिनरसाठी बाहेर जाणार होतो आणि तो अंघोळीला जात होता. त्याने मला तू तोपर्यंत गाडी का बुक करत नाही असं म्हणाला." शनाया याबद्दल पुढे म्हणाली, "मी म्हटलं माझा फोन डेड झाला आहे. मी तुझा फोन वापरू का? त्यावर तो हो, माझा फोन घे आणि त्यावरून गाडी बुक कर अस म्हणाला. त्यानंतर मी त्याचा फोन अनलॉक केला.



## प्रार्थनाची लक्झरियस लाईफस्टाईल आणि स्पष्ट कबुली

मराठी सिनेसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेत्री प्रार्थना बेहेरे नेहमी विविध कारणांमुळे चर्चेत असते. तिने अभिनयक्षेत्रात 'कॉफी आणि बरंच काही' या चित्रपटातून पदार्पण केले. त्यानंतर ती रातोरात स्टार कलाकार झाली. यानंतर तिने एकामागूनएक चित्रपट करत आपल्या अभिनयाची चुणूक दाखवली. नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत अभिनेत्रीने तिच्या आलिशान लाईफस्टाईलबद्दल सविस्तर माहिती दिली आहे. प्रार्थना वेगवेगळ्या भूमिकांमधून प्रेक्षकांसमोर आली. तिची खऱ्या आयुष्यातील आलिशान लाईफस्टाईलचीही नेहमीच चर्चा होते. मात्र अशी लाईफस्टाईल आत्मसात करण्यासाठी किती खर्च होतो, तसेच अभिनेत्री म्हणून पैसे मिळतात का? या सगळ्यावर अभिनेत्रीने सविस्तर भाष्य केले आहे."हो, पैसे मिळतात..भरपूर मिळतात. माझं तरी आयुष्य लक्झरियस आहे. कदाचित माझ्या नवऱ्यामुळे असेल. पण शेवटी आपल्या गरजांवर ते अवलंबून असतं." असे प्रार्थनाने सांगितले. पुढे बोलताना म्हणाली, "मला इंडस्ट्रीत १५ वर्ष झाली पण माझ्या नावावर अजून घर नाही. माझ्या नावावर फक्त कार आहे. मी माझ्या गरजा काय ते पाहिलं. मला घर कधी महत्वाचं नव्हतं. इतर गोष्टी महत्वाच्या होत्या त्यामुळे मी त्यावर लक्ष दिलं. त्यावर पैसा खर्च केला." असे तिने सांगितले. आधी नवऱ्याच्या दोन गाड्या आहेत त्यातच मी फिरायचे. तसंच एक अभिनेत्री म्हणून लाईफस्टाईल मेन्टेन करायला लागते आणि सगळ्यात खूप खर्च येतो, असेही ती सांगायला विसरली नाही. "जेवढं मी कमावते ते सगळं मी लाईफस्टाईलवर घालवते.

## ओशोंनी केलेल्या मागणीला विनोद खन्नांनी दिलेला नकार

विनोद खन्ना जितके त्यांच्या चित्रपटांमुळे प्रेक्षकांच्या लक्षात राहिले, तितकीच त्यांच्या वैयक्तिक आयुष्याचीदेखील चर्चा होताना दिसली. आध्यात्मिक गुरू ओशोंनी दाखवलेल्या मार्गावर चालण्यासाठी त्यांनी चित्रपट कारकिर्दीत शिखरावर असताना अभिनय सोडण्याचा निर्णय घेतला होता.आता विनोद खन्ना यांच्या पत्नी कविता खन्ना यांनी विनोद खन्ना जेव्हा ओरेगॉन समुदायात राहण्यासाठी गेले, तेव्हा काय घडले होते हे यूट्यूबवर सांगितले आहे."त्या पाणी पुरवठ्यात विषबाधा..."कविता म्हणाल्या होत्या, "ओरेगॉन आश्रमात जो पाणी पुरवठा होत असे, त्या पाणी पुरवठ्यात विषबाधा झाली होती. त्यामुळे विनोद खन्ना आजारी पडले होते. त्यामुळे खूप भीती वाटत होती. त्यांनी त्यांच्या मुलांना पाहिले नव्हते. ते मला सांगायचे की त्यावेळी ते खूप रडायचे. ते भारतात परत येऊ शकत नव्हेत. कारण-जर तेव्हा ते भारतात आले असते तर ते पुन्हा परत जाऊ शकले नसते." कविता यांच्या मतानुसार, ओरेगॉन समुदाय नष्ट होण्यापूर्वीच विनोद त्या सगळ्यातून बाहेर पडले होते ही चांगली गोष्ट होती. विनोद खन्नांच्या भावाने त्यांना तिथून बाहेर काढले होते, कारण त्यानंतर ओशोंना अटक झाली.जेव्हा ओरेगॉनमधून विनोद खन्ना बाहेर आले, तेव्हा ते नैराश्यात गेले होते असेही कविता खन्ना म्हणाल्या. "जेव्हा त्याने ओरेगॉन सोडले, तेव्हा त्यांना मोठा धक्का बसला होता, त्याचा परिणाम त्यांच्या शरीरावर दिसत होता. ते मला सांगत असत की मी सेटवर गेलो, सीनचे उत्तम शूटिंग केले, त्यानंतर व्हॅनमध्ये आलो आणि फक्त रडत राहिलो."



## तमन्नाचा 'रागिनी एमएमएस 3' अडचणीत?

तमन्ना भाटिया मुख्य भूमिकेत असलेल्या एकता कपूरच्या 'रागिनी एमएमएस 3' या चित्रपटाबाबत मोठी अपडेट समोर आली आहे. 2025 मध्ये तमन्ना या फ्रँचायझीच्या तिसऱ्या भागात झळकणार असल्याची घोषणा होताच चाहत्यांमध्ये उत्सुकता निर्माण झाली होती. मात्र, चित्रपटाचे शूटिंग सुरू होण्याआधीच तो अडचणीत सापडल्याची माहिती मिळत आहे. 'रागिनी एमएमएस 3'चे दिग्दर्शन साहिर रजा करणार होते. मात्र, आता त्यांना प्रकल्पातून वगळण्यात आले आहे. साहिर रजा सध्या नेटफ्लिक्सवरील एका मालिकेत शो-रनर म्हणून कार्यरत आहेत. स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्मच्या नव्या नियमांनुसार शो-रनरने दररोज सेटवर उपस्थित राहणे आवश्यक असल्याने 'रागिनी एमएमएस 3'च्या शूटिंगवर त्याचा परिणाम झाला. या कारणामुळे निर्मात्यांनी रजांपासून वेगळे होण्याचा निर्णय घेतला आहे. एकता कपूर या चित्रपटात पारंपरिक हॉरर-एरोटिका शैलीपासून दूर जात अधिक सुपरनॅचरल घटकांवर भर देण्याच्या तयारीत आहेत.'रागिनी एमएमएस'ची सुरुवात 2011 मध्ये राजकुमार राव आणि काइनाज मोटिवाला यांच्या चित्रपटातून झाली. त्यानंतर 2014 मध्ये सनी लिओनीचा 'रागिनी एमएमएस 2' प्रदर्शित झाला. यातील 'बेबी डॉल' हे गाणे प्रचंड गाजले होते. दरम्यान, तमन्ना आगामी काळात सिद्धार्थ मल्होत्रासोबतचा 'व्हॅन', तसेच मुंबईचे माजी पोलिस आयुक्त राकेश मारिया यांच्या बायोपिकमध्ये दिसणार आहे.



# झिम्बाब्वेचा कांगारूंवर ऐतिहासिक विजय

## २००७ नंतर पुन्हा इतिहास; टी२० वर्ल्डकपमध्ये ऑस्ट्रेलियावर मात

महाईन्यूज । नवी दिल्ली

**फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण अशा तिन्ही आघाड्यांवर सर्वोत्तम खेळ करत झिम्बाब्वेने टी२० वर्ल्डकप स्पर्धेत ऑस्ट्रेलियाला हरवण्याची किमया केली. झिम्बाब्वेने कोलंबोतल्या आर.प्रेमदासा स्टेडियमच्या आव्हानात्मक खेळपट्टीवर झिम्बाब्वेने सर्वांगीण सुरेख खेळ करत ऑस्ट्रेलियाला निष्प्रभ ठरवलं. झिम्बाब्वेने प्रथम फलंदाजी करताना १६९ धावांची मजल मारली. याचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाचा डाव १४६ धावांतच आटोपला. झिम्बाब्वेने २३ धावांनी विजय मिळवला.**




### पहिल्या टी२० वर्ल्डकपमध्येही झिम्बाब्वेचा विजय

२००७ मध्ये झालेल्या पहिल्यावहिल्या टी२० वर्ल्डकपमध्ये झिम्बाब्वेने ऑस्ट्रेलियाला चीतपट केलं होतं. त्या लढतीत ऑस्ट्रेलियाने १३८ धावा केल्या होत्या. अँड्यू सायमंड्सने ३३ तर ब्रॅड हॉजने ३५ धावा केल्या होत्या. झिम्बाब्वेतर्फे एल्टन चिगंबुराने ३ तर गॅरी ब्रेंटने २ विकेट्स घेतल्या होत्या. ब्रेंडन टेलरच्या ६० धावांच्या बळावर झिम्बाब्वेने ५ विकेट्स राखून हे लक्ष्य गाठलं. व्हुसीमुसी सिंबादाने २३ तर हॅमिल्टन मासाकाटझाने २७ धावा करत ब्रेंडन टेलरला चांगली साथ दिली होती. त्यानंतर १९ वर्षांनंतर झिम्बाब्वेने टी२० वर्ल्डकपमध्ये ऑस्ट्रेलियाला नमवलं आहे.

मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करताना जोश इंगलिस ८ धावा करून तंबूत परतला. मुझाराबानीने त्याला बाद केलं. कॅमेरुन ग्रीनला इव्हान्सने बाद केलं. तो भोपळाही फोडू शकला नाही. मुझाराबानीच्या उसळत्या चेंडूवर टीम डेव्हिड भोपळाही न फोडता तंबूत परतला. इव्हान्सने कर्णधार हेडला त्रिफळाचीत करत ऑस्ट्रेलियाची अवस्था २९/४ अशी केली. यानंतर ग्लेन मॅक्सवेल आणि मॅट रेनशॉ यांनी पाचव्या विकेटसाठी ५९ चेंडूत ७७ धावांची भागीदारी केली. मॅक्सवेल सामना जिंकून देणार असं चित्र असताना बर्लच्या चेंडूवर तो त्रिफळाचीत झाला. त्याने ३१ धावांची खेळी केली. दुखापतीमुळे गोलंदाजी अर्धवट सोडलेला मार्कस स्टॉइनस फलंदाजीला आला. चौकारासह त्याने चांगली सुरुवात केली. मात्र मासाकाटझाने त्याला बाद करत ऑस्ट्रेलियाच्या डावाला खिंडार पाडलं. स्टॉइनसने ६ धावा केल्या. बेन ड्वाशियॅसने लगावलेल्या फटक्याचं मुनयोंगाने अफलातून झेलात रुपांतर केलं.

रेनशॉकडे सूत्रं होती. धावगतीचं आव्हान १५पल्याड गेल्यामुळे रेनशॉने धोका पत्करला. मात्र तो रायन बर्लच्या हातात जाऊन विसावला. रेनशॉने ४४ चेंडूत ६५ धावांची खेळी साकारली. मात्र त्याला दुसऱ्या बाजूने साथ मिळू शकली नाही. रेनशॉ बाद होताच ऑस्ट्रेलियाच्या विजयाच्या आशा मावळल्या. झिम्बाब्वेतर्फे ब्लेसिंग मुझाराबानीने ४ तर ब्रॅड इव्हान्सने ३ विकेट्स घेत ऑस्ट्रेलियाच्या डावाला खिंडार पाडलं.

झिम्बाब्वेने ब्रायन बेनेटच्या अर्धशतकाच्या बळावर १६९ धावांची मजल मारली. बेनेट आणि ताडिवानाशे मारुमानी यांनी ६१ धावांची सलामी दिली. स्टॉइनसने मारुमानीला बाद करत ही जोडी फोडली. त्याने ३५ धावा केल्या. रायन बर्लने बेनेटला चांगली साथ दिली. या जोडीने दुसऱ्या विकेटसाठी ५१ चेंडूत ७० धावांची भागीदारी केली. बर्लला ग्रीनने बाद केलं. त्यानेही ३५ धावा केल्या. यानंतर बेनेटला सिकंदर रझाची साथ मिळाली. या जोडीने २४ चेंडूत ३८ धावा कुटल्या. बेनेटने ५६ चेंडूत ७ चौकारांसह नाबाद ६४ धावांची खेळी केली. बेनेटने सूत्रधाराची भूमिका स्वीकारत खेळी केली मात्र २० षटकं खेळूनही त्याच्या नावावर अर्धशतकच असल्याने स्ट्राईकवरून टीकाही झाली. त्याने ११४च्या स्ट्राईकरेटने धावा केल्या.

ऑस्ट्रेलियाचा कर्णधार मिचेल मार्श दुखापतीमुळे या लढतीतही खेळू शकला नाही. ट्रॅव्हिस हेडकडे संघाचं नेतृत्व होतं. पर्यायी बदली खेळाडू म्हणून स्टीव्हन स्मिथला पाचारण करण्यात आलं आहे. मात्र तो अद्याप कोलंबोत पोहोचलेला नाही असं हेडने नाणेफेकीवेळी स्पष्ट केलं. सामन्यादरम्यान पहिल्या डावात स्टॉइनसही दुखापतग्रस्त झाल्याने ऑस्ट्रेलियाच्या अडचणीत भर पडली. पॅट कमिन्स, जोश हेझलवूड हे प्रमुख गोलंदाज दुखापतीमुळे या स्पर्धेत खेळू शकले नाहीत.

दुसरीकडे झिम्बाब्वेचा कर्णधार सिकंदर रझालाही क्रॅम्पसचा त्रास जाणवला. कोलंबोतलं वातावरण उष्ण आणि दमट असल्यामुळे खेळाडूंना त्रास जाणवला. भारतीय संघाला सलामीच्या लढतीत अमेरिकेने चांगलंच झुंजवलं होतं. वानखेडे स्टेडियमवर झालेल्या लढतीत चाहत्यांच्या प्रचंड पाठिंब्यात नेपाळने इंग्लंडला चांगलंच तंगवलं. इंग्लंडने अवघ्या ४ धावांनी विजय मिळवला होता. आयर्लंडकडे श्रीलंकेला नमवण्याची संधी होती मात्र त्यांनी ती गमावली. झिम्बाब्वेने सगळ्या आघाड्यांवर दर्जेदार खेळ करत ऑस्ट्रेलियाला निरुत्तर केलं.

या विजयासह ब गटाची गुणतालिका रंजक झाली आहे. श्रीलंकेने दोन लढतीत विजय मिळवला आहे.

# रियान परागकडे राजस्थान रॉयल्सच्या नेतृत्वाची धुरा..!

महाईन्यूज । नवी दिल्ली

**आयपीएल २०२६ स्पर्धेला सुरुवात होण्याआधी राजस्थान रॉयल्स संघाने मोठा निर्णय घेतला असल्याची माहिती समोर येत आहे. युवा फलंदाज रियान परागकडे राजस्थान रॉयल्सच्या नेतृत्वाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. आतापर्यंत संजू सॅमसन राजस्थान रॉयल्स संघाचा कर्णधार होता. पण आयपीएल २०२६ स्पर्धेआधी संजू सॅमसनने चेन्नई सुपर किंग्ज संघात प्रवेश केला आहे. तर संजूच्या मोबदल्यात रवींद्र जडेजा आणि सॅम करन यांना राजस्थान रॉयल्स संघात स्थान देण्यात आलं आहे.**

राजस्थान रॉयल्सने स्पर्धेतील पहिल्याच हंगामात जेतेपदाचा मान पटकावला होता. त्यानंतर राजस्थानने अंतिम फेरीत प्रवेश केला, पण जेतेपदाची ट्रॉफी उंचावता आलेली नाही. संजू सॅमसनने संघाची साथ सोडल्यानंतर कर्णधारपदाची जागा रिकामी होती. ईएसपीएन क्रिकइन्फोने दिलेल्या वृत्तानुसार, ही जागा भरून काढण्यासाठी २४ वर्षीय रियान परागची निवड करण्यात आली आहे. रियान परागकडे राजस्थान रॉयल्स संघाचं नेतृत्व करण्याचा अनुभव आहे. गेल्या हंगामात कर्णधार संजू सॅमसन दुखापतग्रस्त




झाल्यानंतर नेतृत्वाची जबाबदारी रियान परागकडे सोपवण्यात आली होती. त्याच्या नेतृत्वाखाली खेळताना राजस्थानने ८ पैकी २ सामने जिंकले होते. या स्पर्धेत फलंदाजी करताना त्याने ३८.५८ च्या सरासरीने धावा केल्या होत्या. यादरम्यान कोलकाता नाईट रायडर्स संघाविरूद्ध केलेली ९५ धावांची खेळी, ही त्याची सर्वोत्तम खेळी ठरली होती.

ईएसपीएन क्रिकइन्फोने दिलेल्या वृत्तानुसार, राजस्थान रॉयल्सचा मुख्य प्रशिक्षक कुमार संगकाराने कर्णधारापदासाठी काही खेळाडूंची मुलाखत घेतली होती. ज्यात रियान परागचा देखील समावेश होता. गेल्या हंगामात राहुल द्रविड हे राजस्थान रॉयल्स संघाचे मुख्य प्रशिक्षक होते. पण ही स्पर्धा झाल्यानंतर त्यांनी हे पद सोडण्याचा निर्णय घेतला होता. आता कुमार संगकाराची मुख्य प्रशिक्षक म्हणून निवड करण्यात आली आहे. गेल्या हंगामात राजस्थान रॉयल्सचा संघ हवी तशी कामगिरी करू शकला नव्हता. १४ पैकी केवळ ४ सामन्यांमध्ये राजस्थानला विजय मिळवता आला होता. तर १० सामन्यांमध्ये पराभवाचा सामना करावा लागला होता. मुख्य बाब म्हणजे, संजू सॅमसनचा चेन्नई सुपर किंग्जसोबत ट्रेड झाल्यानंतर, रवींद्र जडेजाला संघात स्थान देण्यात आलं होतं. जडेजा हा सर्वात अनुभवी खेळाडूंपैकी एक आहे. त्यामुळे संजूनंतर कर्णधारपदासाठी रवींद्र जडेजाचं नाव आघाडीवर होतं. पण असं काहीच झालेलं नाही. राजस्थान रॉयल्सने भविष्याचा विचार करून ही जबाबदारी रियान परागकडे सोपवण्याचा निर्णय घेतला असावा.

स्मार्ट PCMC SMART CITY
# महाईन्यूज™
ePaper
epaper.mahaenews.com
। शनिवार ।
दि. 14 फेब्रुवारी 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# नागरी आरोग्यसेवेस सर्वोच्च प्राधान्य!

## महापौर रवि लांडगे : ‘वायसीएम’ रूग्णालयात पाहणी दौरा

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महापालिकेचे महापौर रवि लांडगे यांनी आज यशवंतराव चव्हाण स्मृती पदव्युत्तर संस्था आणि रुग्णालयाला भेट देऊन विविध विभागांची सर्वंकष पाहणी केली.महापालिका क्षेत्रातील सर्वात मोठ्या आणि महत्त्वपूर्ण रुग्णालयांपैकी एक असलेल्या या संस्थेत नागरिकांना दिल्या जाणाऱ्या उपचारप्रक्रिया, सुविधा, मनुष्यबळ आणि रुग्णालयातील एकूण व्यवस्थेचा महापौरांनी प्रत्यक्ष आढावा घेतला.**



> “वायसीएम रुग्णालयातील डॉक्टर आणि कर्मचारी समर्पणाने काम करत असून नागरिकांना योग्य व तातडीची वैद्यकीय सेवा देण्यासाठी सर्वजण प्रयत्नशील आहेत. नागरिकांना अत्युत्तम, वेगवान आणि विश्वासार्ह आरोग्यसेवा देणे हे आमचे प्राधान्य आहे. सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी आणि सेवांची गुणवत्ता सातत्याने उंचावण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.”
>
> – रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महापालिका.

महापौरांनी आपत्कालीन विभाग, आयसीयू, जनरल आणि स्पेशालिटी वार्ड, शस्त्रक्रिया विभाग, प्रयोगशाळा, रेडिओलॉजी, फार्मसी, नोंदणी कक्ष तसेच वैद्यकीय शिक्षणाशी निगडित विभागांना भेट देऊन संबंधित डॉक्टर व अधिकाऱ्यांसोबत संवाद साधला. रुग्णालयातील दैनंदिन कामकाज, उपचारांची गती, उपलब्ध उपकरणांची स्थिती, विद्यार्थी–डॉक्टर प्रशिक्षण प्रक्रिया आणि नागरिकांना मिळणाऱ्या सेवा यासंबंधी सविस्तर माहिती महापौरांना देण्यात आली.

यावेळी महापौरांनी डॉक्टर, वैद्यकीय अधिकारी, परिचारिका आणि प्रशासकीय कर्मचाऱ्यांशी संवाद साधून कामकाजातील आव्हाने, गरजा, उपलब्ध संसाधने आणि रुग्णसेवांबाबत त्यांचे अनुभव जाणून घेतले.

महापौरांच्या भेटीदरम्यान रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांशी प्रत्यक्ष संवाद साधण्यावर विशेष भर देण्यात आला. महापौर रवि लांडगे यांनी वार्डांमध्ये जाऊन रुग्णांच्या उपचारप्रक्रियेबद्दल, डॉक्टर व परिचारिकांकडून मिळणाऱ्या सेवांबद्दल, स्वच्छता, औषधोपचार तसेच रुग्णालयातील एकूण वातावरणाबद्दल त्यांची मते जाणून घेतली. अनेक रुग्णांनी वेळेत मिळणारे उपचार, कर्मचाऱ्यांचा सहकार्यभाव आणि आवश्यक सुविधांची उपलब्धता याबाबत समाधान व्यक्त केले, तर काहींनी सुधारणा आवश्यक असलेल्या बाबीही स्पष्टपणे मांडल्या.

महापौरांच्या या पाहणी दौऱ्यादरम्यान आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, वायसीएम रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. राजेंद्र वाबळे, अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार, नोडल ऑफिसर डॉ. छाया शिंदे तसेच विविध विभागांचे अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, डॉक्टर, परिचारिका आणि इतर कर्मचारी उपस्थित होते.

# साप्ताहिक व सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी भरता येणार झोपडपट्टी सेवाकर

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महापालिकेच्या झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन विभागामार्फत झोपडपट्टी सेवाकर वसुलीची मोहीम सुरू असून, नागरिकांच्या सोयीसाठी विभागाचे कार्यालय साप्ताहिक तसेच सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही सुरू ठेवण्यात येणार आहे. सेवाकर भरणा सुलभ व्हावा आणि नागरिकांची गैरसोय टळावी यासाठी ही विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. तरी झोपडपट्टीवासीयांनी या सुविधेचा लाभ घेऊन आपला सेवाकर तात्काळ भरावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.**




> झोपडपट्टीवासीयांना कर भरण्यासाठी अधिक सोयीसुविधा उपलब्ध करून देणे ही महापालिकेची जबाबदारी आहे. डिजिटल माध्यमातून क्यूआर कोडद्वारे घरबसल्या सेवाकर भरण्याची सुविधा उपलब्ध झाल्यामुळे नागरिकांचा वेळ व श्रम वाचणार आहेत. तरी ज्यांना ऑनलाईन पद्धतीने कर भरणे शक्य नाही अशा करदात्यांसाठी साप्ताहिक व सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन विभागाचे कार्यालय सुरू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. नागरिकांनी या सुविधेचा लाभ घेऊन वेळेत सेवाकर भरून शहराच्या विकासात आपला सहभाग नोंदवावा.
>
> – रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महापालिका.

महापौर रवि लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर व उपायुक्त अण्णा बोदडे यांच्या अधिपत्याखाली करदात्यांना ऑनलाईन तसेच ऑफलाईन पद्धतीने झोपडपट्टी सेवाकर भरण्याची सुविधा कार्यान्वित करण्यात आली आहे.

चालू आर्थिक वर्षातील झोपडपट्टी सेवाकर वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी विभागाकडून विशेष नियोजन करण्यात आले असून, नागरिकांना विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. सेवाकर बिलाच्या खालच्या उजव्या बाजूस देण्यात आलेल्या क्यूआर कोडद्वारे नागरिकांना घरबसल्या ऑनलाईन स्वरूपात सेवाकर भरता येणार आहे. त्यामुळे नागरिकांचा वेळ व श्रम वाचणार असून डिजिटल पद्धतीने कर भरण्यास चालना मिळणार आहे.

# मुंबई खारघर येथे होणाऱ्या समागमासाठी शहरातून जाणाऱ्या नागरिकांशी आवश्यक समन्वय ठेवा - महापौर रवि लांडगे

## ३५० व्या शहीदी समागमाच्या नियोजनासाठी महापौर रवि लांडगे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**हिंद-दी-चादर’ श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या ३५० व्या शहीदी समागमाच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड शहरातून सहभागी होणाऱ्या नागरिकांसाठी आवश्यक त्या सोयीसुविधांचे सुयोग्य नियोजन करावे. समागमासाठी जाणाऱ्या नागरिकांच्या प्रवास, समन्वय, सुरक्षितता तसेच जनजागृती मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वय ठेवावा, अशा सूचना महापौर रवि लांडगे यांनी दिल्या. याशिवाय, समागमाच्या अनुषंगाने विविध सामाजिक संघटनांच्या प्रतिनिधींकडून प्राप्त सूचनांची दखल घेत महापालिका स्तरावर आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन देखील त्यांनी यावेळी दिले.**

‘हिंद-दी-चादर’ श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या ३५० व्या शहीदी समागमाच्या निमित्ताने आयोजित करण्यात येणाऱ्या भव्य कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने महापौर रवि लांडगे यांच्या अध्यक्षतेखाली पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीमधील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृहात समन्वय बैठक संपन्न झाली, त्यावेळी ते बोलत होते.



या बैठकीस उपमहापौर शर्मिला बाबर, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, उप आयुक्त अण्णा बोदडे, ममता शिंदे, संदीप खोत, राजेश आगळे, क्षेत्रीय अधिकारी किशोर ननवरे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, प्रशासन अधिकारी संगीता बांगर, राजू कांबळे, कार्यकारी अभियंता दिवेकर के.बी, मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल, सहाय्यक सुरक्षा अधिकारी प्रमोद निकम यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते सुनिल चटोले, मोहन बिलडान, नरेंद्र तानर, गुरूमलसिंह, सुरिंदर सिंह नडीवाल, गुरूविंदरसिंह गिल, गोबिंदसिंह धावडा, एम. टी. भोरे तसेच विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी व संबंधित विभागांचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या ३५० व्या शहीदी समागमाचा भव्य कार्यक्रम २८ फेब्रुवारी व १ मार्च २०२६ रोजी नवी मुंबईतील खारघर येथे आयोजित करण्यात आला असून, या कार्यक्रमास पिंपरी चिंचवड शहरातील शीख, सिकलकर, बंजारा, लबाना, सिंधी, महोयाल, वाल्मिकी, उदासीन तसेच भगत नामदेव (वारकरी) संप्रदायासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहून गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या कार्य व बलिदानाच्या इतिहासाला उजाळा देणार आहेत.

या पार्श्वभूमीवर आयोजित बैठकीत समागमाच्या आयोजनाची रूपरेषा, विविध सांस्कृतिक व धार्मिक कार्यक्रमांचे नियोजन, तसेच आवश्यक प्रशासकीय समन्वय याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी विविध सामाजिक संघटना, धार्मिक संस्था व समाज प्रतिनिधी यांचे सहकार्य अत्यंत महत्त्वाचे असल्याचे महापौर रवि लांडगे यांनी यावेळी स्पष्ट केले.

बैठकीदरम्यान उपस्थित सामाजिक कार्यकर्त्यांनी शहरातील विविध भागांमधून समागमासाठी जाणाऱ्या नागरिकांच्या प्रवासासाठी सुयोग्य नियोजन करून समन्वय ठेवण्याची आवश्यकता व्यक्त केली.

# विजया एकादशीला आळंदीत माऊली मंदिरात फुलांची आरास

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**विजया एकादशीच्या निमित्ताने संत ज्ञानेश्वर माऊलींच्या संजीवन समाधी मंदिराला रंगीबेरंगी आणि आकर्षक फुलांची मनोहारी सजावट करण्यात आली आहे. देशी-विदेशी विविध प्रकारच्या फुलांनी मंदिर परिसर बहरून गेला असून भक्तांना भक्तिमय आणि प्रसन्न वातावरणाचा अनुभव येत आहे.**



झेंडू, अष्टर, गोंडा, राजा आदी विविध फुलांचा वापर करून मंदिराला विशेष सजावट करण्यात आली आहे. फुलांच्या नक्षीदार आरासेमुळे संपूर्ण मंदिर परिसर अधिकच देखणा आणि आल्हाददायक दिसत आहे. माऊलींचा मुखवटा फुलांच्या हारांनी आणि नव्या वस्त्रांनी सजवण्यात आला असून तो अत्यंत आकर्षक आणि तेजस्वी भासत आहे.

सकाळपासूनच माऊलींचे हे मनोहारी रूप पाहण्यासाठी भाविकांनी आळंदी नगरीत मोठ्या प्रमाणावर गर्दी केली आहे. “ज्ञानोबा-तुकाराम”च्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला असून भाविक भक्तिभावाने दर्शन घेत आहेत. विजया एकादशीच्या निमित्ताने करण्यात आलेली ही फुलांची सजावट भाविकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरली असून मंदिर परिसरात सर्वत्र उत्साह आणि भक्तिमय वातावरण अनुभवायला मिळत आहे.

# किरकोळ कारणावरुन वाद; चाकूने हल्ला, तरुणाचा मृत्यू...

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**किरकोळ कारणावरून झालेल्या वादातून एका तरुणाचा चाकूने वार करून खून झाल्याची धक्कादायक घटना खेड तालुक्यात उघडकीस आली आहे. बुधवारी (११ फेब्रुवारी) रात्री पावणे दहा वाजताच्या सुमारास नाणेकरवाडी (ता. खेड, जि. पुणे) येथे ही घटना घडली. गंभीर जखमी अवस्थेत रुग्णालयात दाखल केलेल्या तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.**




किशोर सुरेश राणे (वय २५) असे मृत तरुणाचे नाव असून, कपिल जितेंद्र कोसलकर (रा. नाणेकरवाडी, ता. खेड, जि. पुणे) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. या प्रकरणी योगेश दत्तात्रेय नाणेकर (वय ३०, रा. नाणेकरवाडी, ता. खेड) यांनी दक्षिण चाकण पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी कपिल कोसलकर आणि मृत किशोर राणे हे एकमेकांचे मित्र होते. बुधवारी रात्री दोघांमध्ये किरकोळ कारणावरून वाद झाला. वादाचे रूपांतर हाणामारीत झाले आणि संतापाच्या भरात आरोपीने धारदार चाकूने किशोर राणे यांच्या छातीवर व बरगड्यांच्या भागावर वार केले. या हल्ल्यात ते गंभीर जखमी झाले.

घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली. जखमी अवस्थेतील किशोर राणे यांना तत्काळ चाकण येथील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी त्यांच्यावर उपचार सुरू केले; मात्र जखमा गंभीर असल्याने उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच दक्षिण चाकण पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. आरोपीस ताब्यात घेऊन अटक करण्यात आली असून पुढील तपास दक्षिण चाकण पोलीस करत आहेत.

# चाकण औद्योगिक वसाहतीत PMPML बसला भीषण आग; ५० प्रवासी थोडक्यात बचावले

## शॉर्टसर्किटचा संशय; चालकाच्या प्रसंगावधानाने मोठी दुर्घटना टळली

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

**निगडीवरून महाळुंगे एमआयडीसीकडे जाणारी पीएमपीएलची बस चाकण औद्योगिक वसाहतीतील महेंद्रा कंपनीसमोर अचानक पेट घेतल्याची धक्कादायक घटना घडली. प्राथमिक माहितीनुसार शॉर्टसर्किटमुळे ही आग लागल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. काही क्षणांतच आगीने भीषण रूप धारण केल्याने बस पूर्णपणे जळून खाक झाली.**



मिळालेल्या माहितीनुसार, ही बस कामगारांसाठी विशेष फेरी म्हणून सुरू करण्यात आली होती. घटनेच्या वेळी बसमध्ये सुमारे ५० प्रवासी प्रवास करत होते. बसमधून धूर निघू लागल्याचे लक्षात येताच चालक व वाहक यांनी प्रसंगावधान राखत तातडीने बस थांबवली आणि सर्व प्रवाशांना सुरक्षित बाहेर उतरवले. त्यामुळे मोठी जीवितहानी टळली.

प्रत्यक्षदर्शींनी सांगितले की,बसच्या पुढील भागातून अचानक धूर निघू लागला आणि काही क्षणांतच ज्वाळांनी बसला वेढले. बस इलेक्ट्रिक असल्याची प्राथमिक माहिती समोर येत असून, शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. मात्र आगीचे नेमके कारण अधिकृत तपासानंतरच स्पष्ट होणार आहे. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या.जवानांनी तत्काळ आगीवर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न केला. मात्र तोपर्यंत बस पूर्णपणे जळून खाक झाली होती. आगीमुळे काही काळ परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. दरम्यान, औद्योगिक वसाहतीत कामगारांची मोठ्या प्रमाणावर ये-जा सुरू असते. त्यामुळे या घटनेमुळे वाहतूक काही काळ विस्कळीत झाली.

संबंधित यंत्रणेकडून घटनेचा तपास सुरू असून, प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने पीएमपीएलच्या बसची तांत्रिक तपासणी करण्याची मागणी होत आहे.सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली, तरी बस जळून खाक झाल्याने मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

### धूरानंतर बसला आग; ५० प्रवासी बचावले

बसच्या पुढील भागातून अचानक धूर निघू लागल्यानंतर काही क्षणांतच आगीने भीषण रूप धारण केले. चालक व वाहक यांनी प्रसंगावधान राखत तातडीने बस थांबवून सर्व प्रवाशांना सुरक्षित बाहेर उतरवले. अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेत आगीवर नियंत्रण मिळवले; मात्र तोपर्यंत बस पूर्णपणे जळून खाक झाली होती. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले व वाहतूक काही काळ विस्कळीत झाली. आगीचे नेमके कारण अधिकृत तपासानंतर स्पष्ट होणार असून, बसच्या तांत्रिक तपासणीची मागणी होत आहे.

# मोशीतील प्रियदर्शनी स्कूलमध्ये कचरा वर्गीकरण जनजागृती

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

**प्रियदर्शनी स्कूल, मोशी येथे पिंपरी-चिंचवड महानगरपालिका (PCMC) यांच्या सहकार्याने “कचरा वर्गीकरण व अस्वच्छतेचे दुष्परिणाम” या विषयावर जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छता, आरोग्य व कचरा व्यवस्थापनाबाबत जागरूकता निर्माण करणे हा होता.**




कार्यक्रमादरम्यान तज्ञांनी ओला व सुका कचरा वेगळा करण्याचे महत्त्व, योग्य कचरा व्यवस्थापन पद्धती तसेच अस्वच्छतेमुळे होणारे आरोग्यविषयक व पर्यावरणीय दुष्परिणाम याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनात स्वच्छतेच्या

Priyadarshani SCHOOL & JR. COLLEGE

सवयी अंगीकारण्याचे व पर्यावरण संरक्षणासाठी सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन करण्यात आले.

या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छ परिसर राखण्याची जबाबदारी, सामाजिक बांधिलकी व पर्यावरण संवर्धनाबाबत सकारात्मक दृष्टिकोन विकसित करण्याचा प्रयत्न करण्यात आला. कार्यक्रमात शिक्षक, विद्यार्थी व कर्मचारी यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून कार्यक्रम यशस्वी केला.

शाळेच्या वतीने पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाचे सहकार्याबद्दल आभार व्यक्त करण्यात आले. शेवटी शाळेच्या व्यवस्थापन, प्राचार्य व शिक्षकवृंदांनी कार्यक्रमाचे उत्कृष्ट आयोजन व यशस्वी अंमलबजावणीबद्दल सर्व सहभागींचे कौतुक केले.

### ओला-सुका कचरा वर्गीकरणाचे महत्त्व

ओला व सुका कचरा वेगळा करण्याचे महत्त्व स्पष्ट करण्यात आले तसेच अस्वच्छतेमुळे होणारे आरोग्य व पर्यावरणीय दुष्परिणाम याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनात स्वच्छतेच्या सवयी अंगीकारून पर्यावरण संरक्षणासाठी सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन करण्यात आले. शिक्षक, विद्यार्थी व कर्मचारी यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत कार्यक्रम यशस्वी केला.

# Newly Elected Corporators Step In to Resolve Water Crisis at Roseland Residency in Pimple Saudagar

MAHAENEWS I PIMPRI-CHINCHWAD

**RESIDENTS OF ROSELAND RESIDENCY FACED AN ACUTE WATER SHORTAGE AFTER A SUDDEN REDUCTION IN SUPPLY FROM THE PIMPRI-CHINCHWAD MUNICIPAL CORPORATION (PCMC), LEADING TO SIGNIFICANT INCONVENIENCE WITHIN THE SOCIETY.**

## Suggested Water-Saving Measures

ENCOURAGE INSTALLATION OF AERATORS IN TAPS TO REDUCE WATER CONSUMPTION.
REPAIR ALL LEAKAGES, ESPECIALLY IN FLUSH TANKS.
REUSE RO REJECT WATER FOR MOPPING FLOORS AND WASHING VEHICLES.
CLOSELY MONITOR OVERHEAD AND UNDERGROUND WATER TANKS TO PREVENT OVERFLOW AND WASTAGE DURING DISTRIBUTION.
EDUCATE DOMESTIC STAFF ABOUT RESPONSIBLE WATER USAGE.
THE TIMELY RESPONSE FROM PUBLIC REPRESENTATIVES AND ACTIVE PARTICIPATION FROM RESIDENTS HELPED STABILISE THE SITUATION, HIGHLIGHTING THE IMPORTANCE OF COORDINATION IN ADDRESSING CIVIC CONCERNS EFFECTIVELY.



Acting swiftly, newly elected corporators Shatrughna (Bapu) Kate, Kunda Sanjay Bhise and Anita Sandeep Kate visited the society to review the situation on the ground. They were accompanied by officials from the PCMC Water Supply Department.

As an immediate relief measure, five water tankers, each with a capacity of 10,000 litres, were arranged to meet the urgent requirements of residents. The move provided much-needed relief amid the ongoing shortage.

During the visit, instructions were issued to the concerned PCMC officials to restore and regularise the daily water supply at the earliest. The corporators assured residents of their full cooperation and continued support in resolving the issue permanently.

The coordination for the visit was facilitated by Vikram Shinde, Secretary of Roseland Residency CHS, who played a key role in organising discussions between residents, public representatives and civic authorities.

Chairman Mahesh Chaudhary, members of the management committee and several senior citizens interacted with the corporators and briefed them on the challenges faced by the society. Residents expressed gratitude for the prompt intervention and proactive approach taken by the newly elected representatives. Special appreciation was extended to Mrs Babita, Sharad Jadhav and Chandan Chaurisia for their continuous follow-up and efforts during the crisis.

With summer approaching, residents also emphasised the need for preventive steps to avoid similar situations in the future. Chandan Chaurisia urged the society and its members to adopt proactive water conservation measures.

